FORM-IA

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
## First Information Report

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C )

7030

राज्य महाराष्ट्र जिल्हा नाशिक पोलीस ठाणे इंदिरानगर पहिली खबर क्र. ११०८ वर्ष 2022 दिनांक 03/11/2022
State District Police Station FIR No. Year Date

(i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि कलमे Sections ७, ७ अ, १२ प्रमाणे
(ii) अधिनियम Act भा.द.वि. चे कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Others Acts and Section
(a) अपराधाची घटना : वार बुधवार तारीख पासून 02/11/22 वेळ १५:०८ तारीख पर्यंत —— वेळ
Occurrence of Offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी P अशी खूण करा. Time applicable portion )
1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 03/11/2022 वेळ 06:30
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 08/2022 तारीख 03/11/2022 वेळ 06:30
General Diary Reference : Entry No Date Time

माहितीचा प्रकार Type of Information : भ्रष्टाचार लेखी / तोंडी Written / Oral
गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 3 कि.मी. पश्चिम चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्रमांक आनंदनगर
Place of occurence : (a) Direction and distance from P.S Chouki/ Beat/ O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाण नाव मंडल अधिकारी कार्यालय पाथर्डी ता. जि. नाशिक रस्त्याचे नाव
Adress of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण गाव पोस्ट तालुका जिल्हा राज्य
Nearest identifiable Place : Village Post Taluka Dist State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव तालुका जिल्हा राज्य
In case , Outside the limit of this Police Station Taluka Dist State

तक्रारदार / खबर देणाऱ्याचे नाव व पत्ता Complaint/ Informant : Permanent Adress
(a) नाव अब्दुलसमद हमीद चौधरी (b) वडिलांचे / पतीचे नाव हमीद चौधरी
Name Father's / Husbands Name
(c) जन्म तारीख व वय ४८ (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं ९८८०३४५९४८
Date of Birth & Age Nationality Phone No
(e) पारपत्र क्रमांक दिल्याची दिनांक दिल्याचे ठिकाण (f) व्यवसाय व्यापार
Passport No Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लीम जात Caste मुस्लीम जन जात Sub caste
(h) पत्ता : गल्ली/सर्वे नं घर /नाव नंबर फोन/मो. नं पॅन नं ओटर्स नं
Address : Ward House/Name No Phone/M No Pan No Card No
रस्त्याचे नाव जवळचे प्रसिध्द ठिकाण गाव पोस्ट पो. स्टे
Road Nearest Identifiable place Village Post P. Stn.
तालुका जिल्हा राज्य सध्याचा पत्ता २ अहिल्या रो हाऊस फातीमानगर
Taluka Dist State Present Addresss अशोकनगर नाशिक

माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलचा जोडावे.)
Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

1) श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय परांडकर वय-४० धंदा मंडल अधिकारी पाथर्डी ता. जि. नाशिक रा. गोरक्षनाथ बिल्डिंग फ्लॅट नं २ वृंदावन कॉलनी पखालरोड द्वारका नाशिक
2) केतकी बिजला घोटेकर वय-२१ धंदा पंटर रा. नोंदी रा. पाईलाईन बिल्डिंग नं १ फ्लॅट नं ३ पोलीस चौकी इंदिरानगर नाशिक

मुद्रणालय (क) २०३-(५,०००पुस्तके)-१+२०५०

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ना.का.
Reasons for delay in reporting by the complainant/informant
9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकुर पाठीमागे लिहावे
Particulars of properties stolen and involved ( Attach necessary Proform) write down details on blank back page.
10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मुल्य 50,000/- रुपये लाच स्विकारलेली रक्कम
Total value of properties stolen/involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover properties)
11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural/ Accident Death. Case No., if any
12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
F.I.R. Information brief Content (Attach separate sheets, if required ) : Detail Write down back blank page.

वाडरूस वेळी व ठिकाणी यातील आरोपीत मजकूर यांनी यांना। फिर्यादी यांनी त्यांची मौजे पुंयाळे शिवारातील सर्वे नं १६/०१ फ्लॅटवर यचे ३ ताप्रमाणे फिर्यादीचे नावाने नोंद घेण्यासाठी व फिर्यादीने दिलेला अर्जाचा निकाल फिर्यादी मागणी करून द्यावा या करिता, आरोपीनी एक लाख रुपयेची मागणी फिर्यादीकडून आरोपी नं-१ याचे सांगणेवरून आरोपीत २) यांनी फिर्यादीकडून तडजोडी अंती पन्नास हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव श्रीमती वैशाली पाटील पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो नाशिक
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण.
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन जिल्हा राज्य
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I. O.) Rank No
to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to (3) Transferred to P.S.
District on point of jurisdiction.
तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. अब्दुलसमद चौधरी
F.I.R. read over to the Complaint / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complaint/ informant, free of cost
(R.O.A.C.)

14. अब्दुलसमद चौधरी
तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही पोलीस ठाणे अंमलदार इंदिरानगर पो. स्टेशन नाशिक शहर
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name
पदनाम Rank
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting.
Code No. of I. O.

15. १. न्यायालयात सरदर केल्याची तारीख
1. Date and Time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार , 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complaint, 3. Supdt. of Police (Computer), 4. I. O., 5. Office Copy

सत्यप्रत

वरीष्ठ पोलिस निरीक्षक
इंदिरा नगर पो. स्टे. नाशिक शहर

Attachment to item 7 of First Information Report (के) -Form- I- A

Scanned with CamScanner

फिर्याद

इंदिरानगर पो.स्टे.नाशिक शहर
दि. ०३/११/२०२२

माझे नाव अब्दुलसमद हमीद चौधरी वय ४८वर्षे व्यवसाय–व्यापार रा. राजव्हिला बंगलो, फतिमा नगर, अशोका नगर, नाशिक मोबा. ९८९०३४५९४९ समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील नमुद ठिकाणी एकत्रित कुटूंबीय राहण्यास आहे.

दि.०१/११/२०२२ रोजी मी श्रीमती वैशाली पाटील, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.नाशिक यांना फोन करून माझी लोकसेवकाविरूध्द तक्रार असलेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे दिनांक ०१/११/२०२२ रोजी पो.उप.अधिक्षक श्रीमती वैशाली पाटील मॅडम हया पंच व सापळा पथकासह अशोका मार्ग नाशिक येथे आल्यानंतर मी त्यांना समक्ष माझी तक्रार सांगीतली तेव्हा त्यांनी मला माझी तक्रार लिहून देण्यास कळविले. परंतू मला मराठी, हिंदी लिहीता येत नसल्याने मी माझी सांगत असेली तक्रार त्यांना त्यांचे हस्ताक्षरात लिहून घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी माझे सांगणेप्रमाणे तक्रार लिहून घेतली, माझे मौजे चुंचाळे शिवारातील सर्वे नं. १९/१ प्लॉट नं. ४७ क्षेत्र ८३.६२ चौ.मी जागा असून त्यावर मी नबी मेहबुब मोहमद शेख यांचेकडून उसनवार २० लाख रूपये घेवून सदरच प्लॉटची पावर ऑफ ॲटर्नी त्यांचे नावे करून दिली होती. सदर रक्कम मी सन २०२० मध्ये मी त्यांना परत केली होती. परंतू त्यांनी सदर पावर ऑफ ॲटर्नीचा दुरूपयोग करून बेकायदेशीर खरेदीखत मारून घेतले व नाव नोंदणीसाठी अर्ज केला होता. सदर बाब मला माहित नसल्याने व मला पैशाची आवश्यक्ता असल्याने मी प्लॉट विक्रीबाबत श्री. अंजूम शेख यांचेशी व्यवहार केला व प्लॉटची माहीती घेतली असता माझे सर्वे नं. १९/१ प्लॉट नं. ४७ चुंचाळे शिवार या प्लॉटला नबी शेख यांनी पावर ऑफ ॲटर्नीचा दुरूपयोग करून खरेदीखत मारल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्लॉटच्या ७/१२ उता–यावर नबी शेख यांनी नोंदविलेल्या खरेदीखताप्रमाणे नोंद होवू नये म्हणुन मंडळ अधिकारी पाथर्डी ता. जि. नाशिक यांचेकडे अर्ज केला होता. त्यानुसार पाथर्डीचे मंडळ अधिकारी श्री. परांडकर यांनी मला बोलावून घेतले व माझे अर्जाप्रमाणे निकाल देवून श्री. नबी यांच्या खरेदीखताप्रमाणे प्लॉटच्या ७/१२ उता–यावर नोंद न घेण्यासाठी व माझे अर्जाप्रमाणे कार्यवाही करून माझे बाजुने निकाल देण्यासाठी मंडळ अधिकारी श्री. परांडकर व त्यांच्या कार्यालयातील श्रीमती चाटोरकर मॅडम यांनी १०००००/–रू लाचेची मागणी केली असून बोलणीसाठी माझे वकील श्री. चापके यांचेसोबत भेटीसाठी दिनांक ०२/११/२०२२ रोजी बोलाविले आहे.

तरी मला मंडळ अधिकारी श्री. परांडकर व त्यांचे कार्यालयातील महिला श्रीमती चाटोरकर यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तसेच त्यांचेत व माझेत कुठलाही उधार उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच आमचेत कुठलेही पुर्ववैमनस्य नाही. तरी त्यांचेवर आपले मार्फतीने कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. वगैरे आशयाची तक्रार घेण्यात आली.

माझे तक्रारीप्रमाणे ला.प्र.वि.नाशिक येथील अधिकारी श्रीमती.वैशाली पाटील यांनी सोबत आणलेल्या दोन शासकिय पंचाची व सापळा पथकातील सदस्यांची मला ओळख करून दिली. मी दिलेल्या तक्रारी प्रमाणे पो.उप अधीक्षक श्रीमती वैशाली पाटील यांनी मंडळ अधिकारी श्री.परांडकर व त्यांचे कार्यालयातील महिला श्रीमती चाटोरकर हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? याची खात्री करणेसाठी पंचासमक्ष माझेजवळ दि.०२/११/२०२२ रोजी व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून दिले व माझे प्लॉटची सदर केस चालविणारे वकील चापके यांचेसह मला बोलाविले असल्याने मी वकील श्री. चापके व पंच कमांक १ श्री.वाघ अशांना पाथर्डीगाव चौफुली येथून मंडळ अधिकारी कार्यालय पाथर्डीगाव येथे पायी चालत पाठविले. तेव्हा आम्ही मंडळ अधिकारी कार्यालय, पाथर्डीगाव येथे पायी चालत जाऊन मंडळ अधिकारी श्री. परांडकर व तेथील महिला श्रीमती चाटोरकर यांना भेटलो असता, त्यांनी माझे चुंचाळे येथील गट नं. १९/१ मधील प्लॉटची श्री. नबी यांचे अर्जाप्रमाणे ७/१२ उता–यावर नोंद न घेण्यासाठी व माझे अर्जाप्रमाणे निकाल माझे बाजुने देण्याचे मोबदल्यात मंडळ अधिकारी श्री. परांडकर यांचे सांगणेवरून श्रीमती चाटोरकर यांनी १०००००/– रू लाचेची मागणी केली असल्याचे पडताळणी व सापळापुर्व कारवाईत निष्पन्न झाले. परंतु माझेकडे एक लाख रूपये उपलब्ध नसल्याने ५००००रू त्यांना देण्याचे ठरले.

त्याप्रमाणे मंडळ अधिकारी श्री.परांडकर व श्रीमती चाटोरकर यांना देण्यासाठी मी हजर केलेल्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावून सदर पावडर लावलेल्या चलनी नोटा माझे पॅन्टच्या उजवे खिशात ठेवून दिल्या. माझेजवळ पुन्हा व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर चालू करून दिले. व वकील श्री. चापके आणि पंच नं. १ श्री. वाघ यांचेसह मला श्री. परांडकर व श्रीमती चाटोरकर यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील व सापळा पथक थांबलेल्या खाजगी वाहनापासून दिनांक ०२/११/२०२२ रोजी १६:३३ वाजता पायी रवाना केले. व आमचे पाठोपाठ पोलीस उप अधिक्षक श्रीमती पाटील त्यांचे सापळा पथक व पंच नं.२ श्री. जाधव असे खाजगी वाहनापासुन आमचे मागोमाग पायी चालत आले. मी वकील चापके व पंच नं.१ श्री. वाघ असे मंडळ अधिकारी कार्यालय, पाथर्डी येथे गेलो. तेथे श्री. परांडकर मंडळ अधिकारी यांचे सांगणेवरून श्रीमती चाटोरकर यांनी लाचेची रक्कम ५००००/–रू माझेकडून स्विकारले. त्यांनतर मी ठरवून दिलेला इशारा केला असता श्रीमती पाटील मॅडम व त्यांच्या सापळा पथकाने श्री. परांडकर व श्रीमती चाटोरकर यांना सायंकाळी १७:०६ वाजेच्या सुमारास रंगेहाथ पकडले. तेव्हा श्रीमती पाटील मॅडम यांनी स्वताची ओळख देवून श्री. परांडकर यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय परांडकर वय ४०वर्षे व्यवसाय–मंडळ अधिकारी, पाथर्डी ता.जि. नाशिक रा. गौरनीताई बिल्डींग फलॅट नं. २, वृंदावन कॉलनी, पखालरोड, व्दारका, नाशिक असे सांगीतले. त्यानंतर श्रीमती चाटोरकर यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती केतकी किरण चाटोरकर वय ४१वर्षे व्यवसाय–खाजगी काम रा. पाटील गार्डन, बिल्डींग नं.१ फलॅट नं.३, चार्वाक चौक, इंदिरानगर, नाशिक असे सांगीतले.

तरी दिनांक ०२/११/२०२२ रोजी सायंकाळी १७:०६वाजता मंडळ अधिकारी कार्यालय, पाथर्डी ता. जि. नाशिक येथे श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय परांडकर व श्रीमती केतकी किरण चाटोरकर यांनी मी मंडळ अधिकारी पाथर्डी यांचेकडे दिलेल्या अर्जानुसार माझे बाजुने निकाल देवून श्री. नबी यांनी मारलेल्या खरेदीखताप्रमाणे माझे मौजे चुंचाळे शिवारातील सर्वे नं. १९/१ प्लॉट नं. ४७ चे ७/१२ उता–यावर नोंद न घेण्यासाठी श्री. परांडकर मंडळ अधिकारी यांचे सांगणेवरून श्रीमती केतकी चाटोरकर यांनी माझेकडे १०००००/– लाचेची मागणी करून श्री. परांडकर यांचे सांगणेवरून श्रीमती केतकी किरण चाटोरकर यांनी माझेकडून ५००००/–रू लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना सापळा पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणुन माझी १)श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय परांडकर वय ४०वर्षे व्यवसाय–मंडळ अधिकारी, पाथर्डी ता.जि. नाशिक रा. गौरनीताई बिल्डींग फलॅट नं. २, वृंदावन कॉलनी, पखालरोड, व्दारका, नाशिक २) श्रीमती केतकी किरण चाटोरकर वय ४१वर्षे व्यवसाय–खाजगी काम रा. पाटील गार्डन, बिल्डींग नं.१ फलॅट नं.३, चार्वाक चौक, इंदिरानगर, नाशिक यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली ती मी सांगीतले प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष
(सही)
पोलीस ठाणे अंमलदार
इंदिरानगर पो. स्टेशन.
नाशिक शहर

ही फिर्याद लिहून दिली
दि. ०३/११/२०२२
(सही)

पो.ठाणेअं.
फिर्यादी नुसार भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व ७अ प्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास ॲन्टी करप्शन ब्युरो नाशिक यांचेकडे वर्ग करावा.
(सही)

इंदिरानगर पो. स्टे. गु.र.नं. ९६६/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व ७अ प्रमाणे दि.०३/११/२०२२ ०८:३० वा. स्टे.डा.ई.नं.०६/२२ दाखल
(सही)
पोलीस ठाणे अंमलदार
इंदिरानगर पो. स्टेशन

सत्यप्रत
(सही)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
इंदिरा नगर पो.स्टे.नाशिक शहर